महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
अलियावर जंग मार्ग, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ Email : chairman-msbve@nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-४/परीक्षा/निकाल एप्रिल.१९/२०१९/७३२ दिनांक :- १६ /०७/२०१९

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, (सर्व)

विषय - निकाल जाहिर करणे आणि निकाल घोषित केल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत
परीक्षा एप्रिल २०१९

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-४/परीक्षा/वेळापत्रक-एप्रिल१९/२०१९/३६९
दि. ०४/०४/२०१९

महोदय

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येत की, मंडळ कार्यालयामार्फत घेण्यात आलेल्या एप्रिल २०१९ परीक्षेचा निकाल दि. १२/०७/२०१९ रोजी जाहिर करण्यात आलेला आहे. निकालपत्रकाची प्रत मंडळाच्या वेबसाईट www.msbve.gov.in वर अपलोड करण्यात आलेली आहे.

एप्रिल २०१९ परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे निकाल/गुणपत्रक/प्रमाणपत्र यांची छपाई पूर्ण झाली की आपणांस सदर परीक्षा साहित्य घेऊन जाणेचा कार्यक्रम कळविण्यात येइल.

वरील कार्यक्रमाप्रमाणे आपल्या कार्यालयातील मंडळाचे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यास प्राधिकार पत्रासह मंडळ कार्यालयात उपस्थित राहणेबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. उपस्थित कर्मचाऱ्यांना नियमानुसार प्रवासभत्ता मंडळाकडून देय राहिल.

वेबसाईटवर अपलोड केलेल्या निकालपत्रकानुसार जे विद्यार्थी अनुत्तीर्ण आहेत व ज्यांना एप्रिल २०२० मध्ये होणाऱ्या परीक्षेस प्रविष्ठ व्हायचे आहे अशा विद्यार्थ्यांकडून अर्ज/शुल्क भरून त्यांची सी डी खालील कार्यक्रमाप्रमाणे मंडळास सादर करावी.

मंडळाकडून निकाल/गुणपत्रिका/प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर तात्काळ संबधित संस्थांना कळवून सदर निकाल संस्थांना वितरीत करण्यात यावा. तसेच सदर बाबत लेखी नोंद ठेवण्यात यावी.

तरी सदर परीक्षेचा निकाल वाटप करणेपूर्वी आवश्यक त्या बाबींची तपासणी करून विद्यार्थ्यांना गुणपत्रिका/प्रमाणपत्र वितरीत करण्यात यावेत.

१. विद्यार्थी ज्या विषयात अनुत्तीर्ण आहेत, त्या विषयातील गुण * या चिन्हाने अधोरेखित आहेत. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल राखून ठेवण्यात आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर करण्यासाठी आवश्यक बाबींची पुर्तता तात्काळ मंडळाकडे करण्यात यावी. उदा. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे गुण, परीक्षा क्रमांक व वर्ष इ.

२. विद्यार्थ्यांच्या नावात बदल अथवा कोणत्याही प्रकारची दुरूस्तीसाठी शुल्क आकारण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाने विषयनिहाय गुण पडताळणी, उत्तरपत्रिका पुर्नतपासणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रतीचे शुल्क मंडळाच्या नावे असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भरण्याचे चलन व विद्यार्थ्यांची संख्या यांचा तपशिल मंडळ कार्यालयास पाठविण्यात यावे.

परीक्षा एप्रिल २०१९ चा निकाल घोषित केल्यानंतर करावयाच्या कार्यवाहीबाबतचा कार्यक्रम

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | दिनांक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०१९ परीक्षेचा निकाल जाहिर करणे (मंडळाच्या वेबसाईटवर) | १२/०७/२०१९ |
| २. | अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांने संस्थेकडे परीक्षा अर्ज सादर करणे. (नियमित शुल्क रू.२००/-) | २२/०७/२०१९ पर्यंत |
| ३. | अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांने संस्थेकडे परीक्षा अर्ज सादर करणे. (विलंब शुल्क रु. २५०/-) | ३१/०७/२०१९ पर्यंत |
| ४. | संस्थेने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती सॉफटवेअरमध्ये भरलेली सीडी व नियमित/विलंब शुल्क मंडळाच्या खात्यात भरल्याबाबतच्या चलनाची प्रत जिल्हा कार्यालयाकडे सादर करणे. | ०३/०८/२०१९ पर्यंत |
| ५. | एप्रिल २०२० मध्ये होणा-या परीक्षेस बसू इच्छिणा-या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची संस्थेकडून प्राप्त झालेली माहिती एकत्र करून त्याची सीडी करून जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी मंडळ कार्यालयास सादर करणे. | ३१/०८/२०१८ पर्यंत |

अ) उत्तरपत्रिका पुर्नतपासणीसाठी (Re Checking) बाबतचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | दिनांक |
|---|---|---|
| १. | अ) गुणपडताळणी (Re Totaling) साठी विद्यार्थ्यानी संबधित संस्थाकडे विहित शुल्कासह अर्ज करणे. | ३१/०७/२०१९ पर्यंत |
| | ब) उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रतीसाठी विद्यार्थ्यानी संबधित संस्थाकडे विहित शुल्कासह अर्ज करणे. | |
| २. | अ) संस्थेने, विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले गुणपडताळणी (Re Totaling) साठीचे अर्ज व स्टेट बँकेत मंडळाच्या खाती शुल्क भरल्याची चलनाची प्रत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे सादर करणे. | ०३/०८/२०१९ पर्यंत |
| | ब) संस्थेने विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रतीसाठीचे अर्ज व स्टेट बँकेत मंडळाच्या खाती शुल्क भरल्याची चलनाची प्रत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे सादर करणे. | |
| ३. | अ) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी संस्थेकडून प्राप्त झालेल्या गुणपडताळणी (Re Totaling) साठीचे अर्ज मध्यवर्ती तपासणी केंद्राकडे पाठवणे. | ०९/०८/२०१९ पर्यंत |
| | ब) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रतीसाठीचे अर्ज मध्यवर्ती तपासणी केंद्राकडे पाठवणे. | |
| ४. | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जावरुन गुणपडताळणी (Re Totaling) व उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रती याबाबत मध्यवर्ती तपासणी केंद्राने आवश्यक ती कार्यवाही करून गुणपडताळणी प्रकरणाबाबत ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये फरक आहे त्यांची मूळ उत्तरपत्रिका मंडळाकडे पाठविणे. | २०/०८/२०१९ पर्यंत |

ब) उत्तरपत्रिका पुर्नतपासणीसाठी (Re Checking) बाबतचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | दिनांक |
|---|---|---|
| १ | उत्तरपत्रिका पुर्नतपासणीसाठी (Re Checking) विद्यार्थ्यांनी संबधित संस्थेकडे विहित शुल्कासह अर्ज करणे. | ३१/०७/२०१९ पर्यंत |
| २ | संस्थेने उत्तरपत्रिका पुर्नतपासणी (Re Checking) साठी प्राप्त झालेले अर्ज व स्टेट बँकेत मंडळाच्या खाती शुल्क भरल्याची चलनाची प्रत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे सादर करणे. | ०३/०८/२०१९ पर्यंत |
| ३ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी उत्तरपत्रिका पुर्नतपासणी (Re Checking) साठी प्राप्त झालेले अर्ज मध्यवर्ती तपासणी केंद्राकडे पाठविणे. | ०९/०८/२०१९ पर्यंत |
| ४ | उत्तरपत्रिका पुर्नतपासणी (Re Checking) प्रकरणाबाबत मध्यवर्ती तपासणी केंद्राने संबधित परीक्षार्थ्यांची मूळ उत्तरपत्रिका थेट मंडळ कार्यालयाकडे पाठविणे. | २०/०८/२०१९ पर्यंत |

गुणपडताळणी व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी प्रकरणांमध्ये गुण पडताळणीमध्ये फरक झालेला आहे, त्यासंबधीचा तपशील मूळ उत्तरपत्रिकांसह खालील नमून्यात परीक्षा मंडळास पाठविणे.

| अ. क्र. | नोंदणी क्र. | बैठक क्र. | विषयाचे नाव | पूर्वीचे गुण | फेरतपासणी नंतरचे गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |

(एस. के. वायदंडे)
सचिव
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रत - १) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण, प्रादेशिक कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव सादर.
२) परीक्षा विभाग/संगणक विभाग — सदर पत्र वेबसाईटवर अपलोड करण्यात यावे.
३) निवड नस्ती.